निवडक



पांडवनगर : हुतात्मा राजगुरु विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात सायबर अवेअरनेस कार्यक्रमात बोलताना दयानंद ढोमे. अन्य मान्यवर.

# पांडवनगर हुतात्मा राजगुरु विद्यालयात सायबर अवेअरनेस कार्यक्रमास प्रतिसाद

पुणे, दि. ४ - पांडवनगर येथील हुतात्मा राजगुरु विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात सायबर अवेअरनेस कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात प्रतिसाद मिळाला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक दयानंद ढोमे, क्वीक हील फाउंडेशनचे सीएसआरचे प्रमुख अजय शिर्के, दामिनी पथकाच्या सदस्या, पंख संस्थेच्या स्मिता आपटे, स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य दयानंद इरकल, प्राचार्य शंकर शेटे उपस्थित होते. यावेळी ढोमे यांनी सायबर गुन्हे, मुलांच्या या वयात येणाऱ्या अडचणी व घेतले जाणारे निर्णय याविषयी मुलांशी चर्चा केली. अजय शिर्के म्हणाले की, फेसबुक, गुगल, इंटरनेट यांचा योग्य वापर करावा, मुलांचे करिअर करण्याचे वय आहे. या वयात करिअरकडे प्राधान्याने लक्ष द्यावे, असे त्यांनी सांगितले. दयानंद इरकल यांनी पांडवनगर येथील मुलांच्या अडचणी, पालकांच्या स्थितीवरून मुलांनी योग्य वर्तन करावे, शैक्षणिक गुणवत्ता वाढावी याविषयी मार्गदर्शन केले. प्राचार्य शंकर शेटे यांनी विद्यार्थ्यांशी उपक्रमाबाबत चर्चा केली. शारदा शेटे यांनी रयत शिक्षण संस्थेमध्ये ज्युनियर कॉलेजच्या उत्कृष्ट गुण मिळवणाऱ्या मुलींच्या सत्काराचे नियोजन केले.